महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र.२६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पीआर-३/मुख्यमंत्री कृषी संजीवनी-२०१७/** 028918 **दिनांक :** 24 NOV 2017

## वाणिज्य परिपत्रक क्र.२९६

**विषय: "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७" या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतक-यांना सवलत.**

**संदर्भ:** १) वाणिज्य परिपत्रक क्र.२९४ दिनांक ०१.११.२०१७.
२) वाणिज्य परिपत्रक क्र.२९५ दिनांक १८.११.२०१७

वरील विषयास अनुसरुन "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७" यापुर्वीच संदर्भिय परिपत्रक क्र.१ अनुसरुन जाहीर झालेली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी संदर्भिय परिपत्रक क्र.२ नुसार दि.३०.११.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

या योजनेत जास्तीत जास्त कृषी ग्राहकांनी सहभागी होण्यासाठी खालीलप्रमाणे अधिकच्या जास्त सवलती जाहीर करण्यात आलेल्या आहेत.

१) ज्या विद्युत जोडणीवर रु. ३०,००० पर्यंत थकबाकी असल्यास, त्या कृषी ग्राहकाने रु.३००० भरुन तसेच विद्युत जोडणीवर रु.३०,००० पेक्षा जास्त थकबाकी असल्यास रु.५००० भरुन या योजनेत सहभागी होता येईल.

२) या रक्कमेचा (रु.३०००/रु.५०००) भरणा ग्राहकाने दि.३०.११.२०१७ पुर्वी करावयाचा आहे.

३) ज्या ग्राहकांचा वीज पुरवठा यापुर्वीच खंडीत करण्यात आलेला आहे, त्यांचा वीज पुरवठा सदर रक्कमेचा (रु.३०००/रु.५०००) भरणा केल्यानंतर सुरळित करावा.

४) कृषीपंपाच्या वीज देयकाच्या दुरुस्तीबाबत ब-याच तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तेव्हा वीज बिलाच्या दुरुस्तीसाठी दि.१.१२.२०१७ ते दि. ३१.१२.२०१७ या कालावधीत फिडरनिहाय शिबिराचे आयोजन करावे. या शिबिरामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करावी व वीज बिलाची तक्रार राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) या जाहीर झालेल्या सवलतीबाबत स्थानिक स्तरांवर प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

६) या व्यतिरिक्त यापुर्वी संदर्भिय परिपत्रक क्र.१ व २ नुसार वितरीत करण्यात आलेल्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना: प्रेषण यादीप्रमाणे.**